MHSO030107852019

दाखल दि. - ०९/०८/२०१९
नोंदणी दि. - ०९/०८/२०१९
निकाल दि. - ०३/०९/२०२२
कालावधी - व. म. दि.
०३ ०० २४

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (दारुबंदी न्यायालय), जिल्हा सोलापूर यांच्या न्यायालयात.**
**(पिठासीन अधिकारी – श्रीमती नम्रता म. बिरादार)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७४६५/२०१९** **निशाणी क्र.०६**

महाराष्ट्र शासन तर्फे,
दुय्यम निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क,
अ–१ विभाग, सोलापूर.
(गुन्हा क्र.२६/अ१/२०१९) **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

**दिपक नामदेव भोंडवे**,
वय – ४० वर्षे, धंदा – मजुरी.
रा. १४५, ति–हेगाव फॉरेस्ट,
सोलापूर. **आरोपी**

---

**दोषारोपपत्र** – **मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये**

---

| | | |
|---|---|---|
| स.स.वकील | – श्री एस.ए. पाटील, | अभियोगपक्षातर्फे. |
| विधीज्ञ | – श्री ए.एन.शेख, | आरोपीतर्फे. |

---

## (न्या य नि र्ण य)

( दि. ०३ सप्टेंबर, २०२२ रोजी घोषीत)

१. आरोपी विरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) नुसार गुन्हा केल्याचा आरोप आहे.

२. अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की, दि.३०/०१/२०१९ रोजी फिर्यादी

पी.डी.पुसावळे, जवान/०५ यांना बातमी मिळाली होती की, प्रणिती मेडिकलच्या बाजूस, फॉरेस्ट, सोलापूर येथे अवैद्यरित्या हातभट्टी दारुची विक्री होत आहे. त्याप्रमाणे ते व त्यांचे सहकारी मिळून सदर ठिकाणी गेले असता त्याठिकाणी एक इसम कॅन घेऊन बसलेला दिसला. सदर इसमाचा त्यांना संशय आल्याने त्याला जागीच ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातील कॅनची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण १० उग्र व आंबुस वासाची हातभट्टी दारु मिळून आली. चौकशीत सदर इसमाने त्याचे नाव दिपक नामदेव भोंडवे असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी पंचासमक्ष मुद्देमालाचा जप्ती पंचनामा केला व सीए कामी १८० एमएलच्या काचेच्या बाटलीत नमुना घेतले. म्हणुन फिर्यादीने आरोपीविरुध्द फिर्याद दिली व त्याअन्वये तपासाअंती आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

३. मी नि. क्र.०६ अन्वये आरोपीला अपराधाचा तपशील समजाऊन सांगितला. आरोपीने गुन्हा केल्याचे नाकारले आहे. आरोपीचा बचाव पूर्णतः नकाराचा आहे.

४. अभियोगपक्षाचे वकील व आरोपीच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणात दाखल कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता, माझ्यासमक्ष खालील मुद्दे विचारार्थ आहेत. सदर मुद्यांवर कारणमिमांसेसह माझे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| *अ.क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | दि.३०/०१/२०१९ रोजी सकाळी १०.१५ वा.चे सुमारास प्रणिती मेडिकलच्या बाजूस, फॉरेस्ट, सोलापूर येथे आरोपी विनापरवाना बेकायदेशीररित्या हातभट्टी दारु ताब्यात बाळगून त्याची विक्री करीत असताना मिळून असल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

५. प्रस्तुतच्या खटल्यात अभियोगपक्षातर्फे केवळ पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षास तद्नंतर संधी देवून देखील इतर साक्षीदार यांना हजर करुन

त्यांचा पुरावा नोंदवू शकलेला नाही. त्या कारणाने प्रकरण उपलब्ध पुराव्याआधारे गुणवत्तेनुसार विचाराधीन घेण्यात आले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हयाच्या अनुषंगाने कोणताही पुरावा आलेला नसल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम ३१३ अंतर्गत निवेदन वगळण्यात आले. सहाय्यक सरकारी वकील व आरोपीचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**मुद्दा क्रमांक १ साठी–**

६. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात केवळ पंच साक्षीदार क्र.१ अशोक शामराव गायकवाड याची साक्ष नोंदविण्यात आली आहे. परंतु पंच साक्षीदाराने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याबाबत विसंगत अशी साक्ष दिल्यामुळे साक्षीदार यांना फितूर घोषित केले आहे. पंच साक्षीदार फितूर झाल्यामुळे अभियोगपक्षाने खरोखरच आरोपीच्या ताब्यातून बेकायदेशीर द्रव जप्त केले होते, या अनुषंगाने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. पंच साक्षीदार याने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याबाबत विसंगत असे कथन केल्यामुळे घटनास्थळावरील नेमकी परिस्थिती काय होती हे शाबित होत नाही, त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्यासाठी केवळ पंच साक्षीदार याचा पुरावा उपयुक्त ठरु शकत नाही. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात केवळ पंच साक्षीदार यांच्याशिवाय इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. अभियोग पक्षाने खरोखरच आरोपीच्या ताब्यातून हातभट्टी दारु जप्त केल्याचे शाबीत करण्यासाठी खबरी तसेच छापा पथकातील इतर साक्षीदार यांना तपासणे आवश्यक होते.

७. एखादया आरोपीस महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये असलेल्या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यासाठी आरोपीच्या ताब्यातून विनापरवाना किंवा आरोपी विनापरवाना हातभट्टी दारु विक्री करीत असल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात अभियोग पक्षाने महत्वाचे साक्षीदार म्हणजेच खबरी तसेच छापा पथकातील इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविली नाही. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात तपासी अंमलदार यांची साक्ष देखील नोंदवलेली नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. परंतु, पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे, घटनास्थळावरुन जप्त करण्यात

आलेले द्रव ही आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आली होती असे निष्कर्ष काढणे योग्य ठरु शकत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप अभियोगपक्ष निःसंशयपणे शाबीत करणेमध्ये अपयशी ठरलेला आहे. सबब, वरील विवेचनाआधारे मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी दिले आहे.

**मुद्दा क्र. २ साठी** –

८. मुद्दा नं. १ चे उत्तर नकारार्थी दिल्याने आरोपीला महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) चे गुन्हयातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित राहील, म्हणून मुद्दा क्र.२ दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित केला आहे.

## आ दे श

१. आरोपी **दिपक नामदेव भोंडवे**, रा. १४५, ति–हेगाव फॉरेस्ट, सोलापूर याची महाराष्ट्र दारुबंदी कायदयाच्या कलम ६५(ई) अन्वये असलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. आरोपीला मुक्त करण्यात यावे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल सदर खटल्याच्या न्यायनिर्णयास आव्हान देण्याची मुदत संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे रक्कम रु. ५०००/– चे वैयक्तिक बंधपत्र अपिल झाल्यास अपिलकामी हजर राहणेसाठी दाखल करावा.

Digitally signed by NAMRATA MAHADEV BIRADAR
Date: 2022.09.03 16:57:42 +0530

दिनांक ०३/०९/२०२२.

(श्रीमती नम्रता म. बिरादार)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
दारुबंदी न्यायालय, सोलापूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : A. S. Bakale |
| Court | : 6th Jt. Civil Judge J. D. & J.M.F. C. (Prohibition Court) Solapur. |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | : 03.09.2022 |
| Judgment / Order uploaded on | : 03.09.2022 |